**डिस्क्लेमर**

ह्या माहिती पत्रकातील सर्व माहिती दिनांक ३ जुलै २०२१ पर्यंतची आहे आणि वेबसाईट किंवा त्या संबंधित संसाधानामधून गोळा केली गेली आहे. ह्यात वेळोवेळी बदल होऊ शकतात किंवा केले जाऊ शकतात. हे फक्त आपल्या मार्गदर्शनासाठी आहे. पुढे जाण्यापूर्वी माहितीची खातरजमा करून घ्या.

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

## यूडीआयडी कार्ड बद्दलची अधिक माहिती

यूडीआयडी कार्ड अपंग व्यक्तींसाठीचे एक विशेष ओळखपत्र आहे. राज्यसभेने १४/१२/२०१६ रोजी यूडीआयडी कार्डसाठी एक विधेयक मंजूर केले. या कायद्यात २१ प्रकारच्या अपंगत्वांचा समावेश करण्यात आला आहे. विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अपंग व्यक्तीची ओळख आणि पडताळणीसाठी ह्या एकमेव कागदपत्राचा वापर होतो. कार्डमध्ये दिव्यांग व्यक्तीबद्दल सर्व आवश्यक माहिती तपशीलवार समाविष्ट केलेली असते आणि त्यामुळे अनेक कागदपत्रे सोबत बाळगण्याची गरज भासत नाही.

## अपंगत्व कार्ड (यूडीआयडी कार्ड) चे फायदे

१. यूडीआयडी कार्डसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो.

२. अपंग व्यक्तींना कागदपत्रांच्या अनेक प्रती बनवण्याची आणि अनेक कागदपत्रे सोबत बाळगण्याची आवश्यकता रहात नाही कारण कार्ड मध्ये सर्व आवश्यक माहिती कॅप्चर केलेली असेल जी एका उपकरणाच्या साहाय्याने डीकोड केली जाऊ शकते.

३. यूडीआईडी कार्ड धारकाला यापुढे अपंगत्वाचा पुरावा म्हणून विविध कागदपत्रे बाळगण्याची गरज नाही. एखाद्याचे अपंगत्व सिद्ध करण्यासाठी यूडीआईडी कार्ड सर्व ठिकाणी स्वीकृत असेल.

४. हे कार्ड वापरल्याने दिव्यांग लोकांना, जेथे कुठे लागू असेल तेथे, अपंगत्व प्रमाणपत्र (डिस्एबलिटी सर्टिफिकेट) संबंधित भौगोलिक वैधतेबद्दल येणाऱ्या समस्यांवर मात करण्यास मदत होते.

५. हे कार्ड क्रेडिट कार्डच्या आकाराचे असेल. ते सोबत बाळगणे सोपे असते.

६. अपंगत्वाशी संबंधित डेटा डुप्लिकेट होणार नाही कारण संगणक प्रणाली सर्व माहितीची विशिष्टता सुनिश्चित करू शकते.

७. सरकारमध्ये काही बदल झाल्यास प्रणाली सहजपणे सुधारित केली जाऊ शकते.

८. व्यक्तीच्या अपंगत्वाची व्याप्ती ओळखणे सोपे होते. ४०% पेक्षा कमी अपंगत्व असलेल्या व्यक्तीकडे पांढरी पट्टी असलेले कार्ड असेल, ४० ते ८०% अपंगत्व असलेल्या व्यक्तीकडे पिवळी पट्टी असलेले कार्ड असेल आणि ८०% पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीकडे निळी पट्टी असलेले कार्ड असेल.

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

९. यूडीआयडी कार्ड भविष्यात विविध फायदे मिळवण्यासाठी दिव्यांग व्यक्तीची ओळख, पडताळणी यासाठी एकमेव कागदपत्र असेल.

१०. गाव, ब्लॉक, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा विविध स्तरांवर यूडीआयडी कार्ड, लाभार्थीची भौतिक आणि आर्थिक प्रगती समजून घेण्यास मदत करेल.

## यूडीआयडी कार्डसाठी कोण अर्ज करू शकते?

१. कोणत्याही प्रकारचे अपंगत्व असलेली दिव्यांग व्यक्ती.

२. बहिरेपणा असलेली मुले ज्यांना कानास साठ डेसिबल किंवा त्यापेक्षा जास्त हानी आहे, अशी मुले फ्रिक्वेन्सीच्या संभाषणात्मक श्रेणीमध्ये अर्ज करू शकतात.

३. दिव्यांग व्यक्ती ज्यांच्याकडे आधीच दिव्यांग प्रमाणपत्र (डिस्एबलिटी सर्टिफिकेट) आहे.

४. दिव्यांग व्यक्ती ज्यांच्याकडे कोणतेही दिव्यांग प्रमाणपत्र (डिस्एबलिटी सर्टिफिकेट) नाही.

५. दिव्यांग व्यक्ती ज्यांनी दिव्यांग प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे आणि त्यांची दिव्यांग प्रमाणपत्राची प्रक्रिया सुरू आहे.

६. दिव्यांग व्यक्ती ज्यांचे प्रमाणपत्र तात्पुरते आहे आणि ज्यांना पुनर्मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे.

७. दिव्यांग व्यक्ती ज्यांचे अर्ज नाकारले गेले होते / ज्यांना दिव्यांग प्रमाणपत्राच्या पुनर्मूल्यांकनासाठी पुन्हा अर्ज करायचा आहे.

८. भारतात कोठूनही ऑनलाईन अर्ज केला जाऊ शकतो.

## यूडीआईडीकार्ड मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे.

१. मुलाच्या फोटोची स्कॅन कॉपी (15KB ते 30KB)
२. सही/अंगठ्याच्या ठश्याची स्कॅन कॉपी (3KB ते 30KB)
३. अड्रेस प्रुफ ची स्कॅन कॉपी (आधार/पॅन कार्ड/रेशन कार्ड इत्यादी) (10KB ते 100KB)
४. ओळख पत्राची स्कॅन कॉपी (आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायविंग लायसन्स इत्यादी) (10KB ते 100KB)
५. दिव्यांग प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी (सक्षम अधिकाऱ्या द्वारा प्रमाणित) (10KB ते 100KB)

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

## यूडीआईडीकार्डसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया

१) यूडीआईडीकार्डसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी www.swavlambancard.gov.in या संकेतस्थळावर जा.

२) होम पेज वर "डिसएबलिटी सर्टिफिकेट आणि यूडीआईडी कार्डसाठी अर्ज" या पर्यायावर क्लिक करा.

३) पहिल्या टॅब म्हणजेच वैयक्तिक माहिती मध्ये "*" (स्टार) ने चिन्हांकित जागा भरा. मुलाचा फोटो, आधारकार्ड अंगठ्याचा ठसा किंवा सही योग्य रीतीने अपलोड करा आणि 'पुढे जा' या बटनावर क्लिक करा.

४) दुसऱ्या टॅब मध्ये म्हणजेच दिव्यांग व्यक्तीची माहिती मध्ये दिव्यांग प्रमाणपत्र अपलोड करा आणि सर्व आवश्यक माहिती भरा.

५) तिसऱ्या टॅब मध्ये म्हणजेच रोजगारा संबंधित माहितीमध्ये आवश्यक माहिती भरा.

६) चौथ्या टॅब मध्ये ओळखपत्र (आधार कार्ड) अपलोड करा करा आणि आवश्यक माहिती भरा.

७) फॉर्म भरून झाल्यानंतर सर्व माहिती पुन्हा तपासून पहा. जर आपण काही सुधार (काही बदल) करू इच्छित असाल तर आपण अप्लिकेशन एडीट या टॅब वर क्लिक करू शकता. (एकदा सबमिट केल्यानंतर आपण काहीही बदल करू शकणार नाही).

८) फॉर्म जमा केल्यानंतर आपल्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर नावनोंदणी क्रमांक (एनरोलमेंट नंबर) येईल जो भविष्यात आपल्या प्रक्रियेचा मागोवा घेण्यासाठी आपल्याला सांभाळून ठेवावा लागेल. पावती ची प्रिंट आउट काढून घ्या.

९) सर्व माहिती पडताळण्यासाठी प्रमुख आरोग्य अधिकारी (सीएमओ) कार्यालय/आरोग्य विभाग यांच्याकडे जमा केली जाईल.

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

१०) सीएमओ कार्यालय/आरोग्य विभाग आपली सर्व माहिती पडताळून पाहिलं. पडताळणी झाल्यानंतर सीएमओ कार्यालय/आरोग्य विभाग मूल्यमापन करण्यासाठी संबंधित तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करेल. पावतीमध्ये काही रुग्णालयांची नावे दिलेली असतील. पुढील मूल्यमापन करण्यासाठी त्यापैकी एका रुग्णालयास भेट द्या.

११) तज्ञ डॉक्टर दिव्यांग व्यक्तीच्या (पीडब्ल्यूडी) अपंगत्वाची तपासणी करतील आणि अपंगत्वावर आपले मत देतील.

१२) वैद्यकीय समिती केस चा अभ्यास करेल आणि अपंगत्वाचे प्रमाण (%) ठरवेल. सीएमओ कार्यालय दिव्यांग प्रमाणपत्र आणि यूडीआईडी तयार करेल.

१३) यूडीआईडी मधील माहिती यूडीआईडी कार्ड छपाईसाठी पुढे पाठवली जाईल.

१४) आपले यूडीआईडी कार्ड तयार झाल्यानंतर आपल्याला एक संदेश पाठवला जाईल कार्ड दिलेल्या संकेतस्थळावर नावनोंदणी क्रमांक टाकून प्रिंट केले जाऊ शकते.

१५) प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर यूडीआईडी कार्ड पोस्टाने दिलेल्या पत्त्यावर पाठवले जाईल.

१६) अर्ज करून झाल्यानंतर आपण वर दिलेल्या संकेतस्थळावर जाऊन यूडीआईडी कार्ड स्टेटस वर क्लिक करून अर्जाची सद्य स्थिती पाहू शकता.

- **यूडीआईडीकार्ड ची वैधता**

तात्पुरत्या अपंगत्वासाठी यूडीआईडी कार्डची वैधता ५ वर्ष असते आणि कायम स्वरुपाच्या अपंगत्वासाठी याची वैधता कायम स्वरूपी असते.

जर कार्डवर कॅपिटल अक्षरात "P" लिहिलेले असेल तर त्याचा अर्थ ते कार्ड कायम स्वरूपी आहे परंतु जर कार्डवर कॅपिटल अक्षरात "T" लिहिलेले असेल तर त्याचा अर्थ ते कार्ड ५ वर्षांपर्यंत वैध आहे.

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

- **नूतनीकरण प्रक्रिया, यूडीआईडी कार्ड हरवणे किंवा अर्ज करून सुद्धा यूडीआईडी कार्ड न मिळणे.**

- **नूतनीकरणाची प्रक्रिया**

यूडीआईडी पोर्टल वर जा आणि होमपेजवर "दिव्यांग प्रमाणपत्र आणि यूडीआईडी कार्ड नुतनीकरण" टॅबवर क्लिक करा. आवश्यक माहिती भरा आणि जमा करा.

- **यूडीआईडीकार्ड हरवणे -**

युडीआईडी कार्ड पोर्टलच्या होमपेज वर युडीआईडी कार्ड हरवले आहे या पर्यायावर क्लिक करा आणि अर्ज करण्यासाठी आवश्यक माहिती भरा.

- **अजूनही युडीआईडी कार्ड मिळालेले नाही?**

जर मूल्यमापन केले गेलेअसेल आणि तरी सुद्धा कार्ड मिळालेले नसेल तर एक अर्ज लिहा आणि मूल्यमापनाची (असेसमेंट) पावती घेऊन रुग्णालयात जा आणि कार्ड बद्दल अधिक चौकशी करा.

**मुंबईतील या अंतर्गत येणारी रुग्णालये:**

www.swavlambancard.gov.in

| क्रमांक | क्षेत्र | रुग्णालयाचे नाव | आठवड्यातील दिवस | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | पालघर. | | | |
| | | ग्रामीण रुग्णालय | खात्री करून घ्या. | खात्री करून घ्या. |
| २. | ठाणे | | | |
| | भाईंदर | पंडित भिसेनजोशी हॉस्पिटल | बुधवार | सकाळी १०:०० ते दुपारी २:०० |
| | वाशी | एनएमएमसी सामान्य रुग्णालय | बुधवार आणि गुरुवार | सकाळी ९:३० ते दुपारी १२:३० |
| | ठाणे (पश्चिम) | व्ही.एस.सामान्य रुग्णालय | बुधवार आणि गुरुवार | सकाळी १०:०० ते दुपारी १:०० |
| | कळवा | छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल | मंगळवार आणि शुक्रवार | सकाळी १०:०० ते दुपारी १:०० |
| ३. | मुंबई उपनगर | | | |
| | जुहू | डॉ. रुस्तम नरसीकूपर-महानगरपालिका सामान्य रुग्णालय | बुधवार आणि शुक्रवार | सकाळी १०:०० ते दुपारी २:०० |
| ४. | मुंबई | | | |
| | मुंबई सेंट्रल | नायर हॉस्पिटल | रोज | सकाळी ८:०० ते १०:०० |
| | भायखळा | जेजे हॉस्पिटल | बुधवार | सकाळी १०:०० ते दुपारी २:०० |
| | वांद्रे | अली यावर जंग राष्ट्रीय संस्था | बुधवार | सकाळी ९:०० ते दुपारी १२:३० |

Source: www.swavlambancard.gov.in and Relevant Medical Authority of UDID Card Department.

## YOUR SUPPORT!

At VConnect we really want to make a difference to the lives of thousands of children with hearing loss in and around India in our endeavor to successfully mainstream them at all levels.

**All donations to VConnect Foundation are 50% exempt from tax under section 80G of the Income Tax Act.**

**Cheques & Demand Drafts to be made in the name of 'VConnect Foundation' Direct online fund transfers details are as under:**

A/c: VConnect Foundation
Savings Account
Account Number: 3014605126
Bank details: Central Bank of India, Colaba Causeway Branch, Mumbai 400005
IFSC CODE: CBIN0281407

**For foreign donations (FCRA Account):**
A/c: VConnect Foundation
Savings Account
Account Number: 40274065525
Bank details: State Bank of India, FCRA Cell, 4th Floor, New Delhi Main Branch, 11 Sansad Marg, New Delhi 110001
IFSC CODE: SBIN0000691
SWIFT: SBININBB104

## Trust & Contact Details

**Name of the Trust:** VConnect Foundation
**Legal Status:** Charitable Trust
VConnect Foundation is a registered not-for-profit company under section 25 of the Indian Companies Act (1956) and has tax exempt status in India under section 80(G) of the Income Tax Act (1961).
**Registered Office:** C-216, Bunyaan, Seth Moti Shah X Lane, Byculla (E), Mumbai 400 027, India
**Correspondence:** R-7, Cusrow Baug, Shahid Bhagat Singh Road, Mumbai 400001
**Contact No:** +91 9820409019
**Email Id:** contact@vconnectfoundation.org
**Website:** www.vconnectfoundation.org
**Facebook:** https://www.facebook.com/VConnectfoundation/
**LinkedIn:** https://www.linkedin.com/company/vconnectfoundation/
**Instagram:** http://www.instagram.com/vconnectfoundation/
**YouTube:** https://youtube.com/vconnectfoundation
**Twitter:** https://twitter.com/VConnect